महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र कारागृह विभाग

नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह,नाशिक-422101

# ई-दरपत्रक निवीदा सुचना

## Prison Department website-http://mahaprisons.gov.in

नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहातील उपहारगृह (कॅन्टिन)विभागातील
ई-दरपत्रक निवीदा.

# अटी व शर्ती

## (ई-दरपत्रक निवीदा प्रक्रियेत खालील अटी व शर्ती बंधनकारक राहतील)

१.पुरवठाधारक संस्थेकडुन संस्थेच्या नावाचे पॅनकार्ड व जीएसटी नोंदनी क्रमांक घेण्यात यावा.

२.वस्तुंचा पुरवठा हा कारागृहापर्यंत देणे गरजेचे आहे.

३.पुरवठ्यासाठी कोणतेही वाहतुक भाडे दिले जाणार नाही.

४.प्राप्त दर हे सर्व करासह असावेत.

५.जाहिरातीत पुरवठादारांकडुन ई-दरपत्रक प्रक्रियेसाठी तांत्रीक अर्ज व व्यवसायीक अर्ज(दरपत्रक)असे दोन प्रकारचे अर्ज करणे गरजेचे आहे.

६.यातील तांत्रिक अर्ज हा जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे अधिक्षकांच्या ई-मेल आयडीवर rksali2018@gmail.com विहीत मुदतीत पाठविणे गरजेचे आहे, तर व्यावसायीक अर्ज (दरपत्रक) हे संबंधीत पुरवठादाराने ई-दरपत्रक प्रक्रिया उघडण्याच्या दिवशी स्वतः सिलबंद पाकिटात घेवुन येणे गरजेचे आहे.

७.तांत्रिक अर्जात दरांचा व दरपत्रकांचा समावेश नसल्यामुळे हि माहिती उघड स्वरुपाची राहील.

८.पुरवठादार अधिक्षकांचे ई-मेल आयडी rksali2018@gmail.com यावर तांत्रिक अर्ज पाठवितांना त्याची एक (CC)प्रत मा.कारागृह उपमहानिरीक्षक,मध्यविभाग,औरंगाबाद यांचे ई-मेल digaurangabad-mh@gov.in आयडीवर पाठवतील.

९.पुरवठादारांनी अधिक्षकांच्या ई-मेल आयडीवर तांत्रिक अर्ज पाठविण्याबाबत तो न मिळाल्याने कुठला वाद निर्माण झाल्यास कारागृह उपमहानिरीक्षक यांच्या ई-मेल आयडीवरुन त्याची पडताळणी होईल व्यावसायीक अर्ज उघडण्याआधी कारागृह उपमहानिरीक्षक यांच्या ई-मेल आयडीवर प्रत (CC) म्हणुन आलेल्या अर्जाची माहिती समीती समोर ठेवावी.

१०.कारागृह अधिक्षक यांच्यावरील नमुद ई-मेल आयडीवर जरी पुरवठादाराच्या तांत्रीक अर्ज दिसुन आला नाही मात्र कारागृह उपमहानिरीक्षक यांच्यावरील ई-मेल आयडीवर अर्ज विहीत वेळेत मिळाला असेल तर तो ग्राह्य धरण्यात येईल.

११.एकदा तांत्रिक ई-दरपत्रकाचा अर्ज पाठविल्यानंतर त्याच पुरवठादाराने दुसऱ्यांदा तांत्रिक ई-दरपत्रकाचा अर्ज पाठविल्यास तो ग्राह्य धरला जाणार नाही.

१२.तांत्रिक अर्ज करतांना पुरवठादाराने पुरवठादाराकडे कारागृह प्रशासनाने मागणी केलेली कागदपत्रे स्कॅन करुन त्यांच्या अधिकृत लेटरहेडवरील अर्जासह कारागृह अधिक्षकांच्या ई-मेलवर पाठविणे गरजेचे आहे.कारागृहाकडुन कुठलाही प्रकारचा फॉर्म देण्यात येणार नाही.

१३.सदर अर्जात पुरवठादार स्वतः उपस्थित राहणार आहेत किंवा त्यांच्या प्रतिनीधी उपस्थित राहणार हे नावानिशी व ओळखपत्राच्या स्कॅन प्रतीसह.ई-मेलव्दारे कळविणे बंधनकारक आहे.

१४.पुरवठादाराने ज्या ई-मेल आयडीवरुन ई-दरपत्रकाबाबत तांत्रिक अर्ज केला आहे त्याच ई-मेल आयडीवरुन झालेला पत्र व्यवहार ग्राह्य धरण्यात येईल.

१५.निवीदाकार यांनी या कारागृहाच्या बॅंक खात्यावर **खाते क्रमांक 50100212660632**
**खातेनाव- Admin officer, nasik road central prison,**
(HDFC bank nasik road) **nasik**, IFSC code-0000456
**पुरवठादाराने रुपये १०,०००/-(दहा हजार फक्त)**बयाना रक्कम भरणे गरजेचे आहे.तांत्रिक अर्ज भरण्याच्या अंतिम तारखेपर्यंतच बयाना रक्कम भरल्याची नोंद तांत्रिक अर्जासोबत ई-मेल करणे गरजेचे आहे.

१६.दरपत्रके उघडण्याची अंतिम तारीख हि **दिनांक. २२.०२.२०१९, वेळ सकाळी ११.०० वाजता** राहील.

१७.तांत्रिक अर्ज भरण्याची अंतिम तारीख उलटल्यानंतर येणारा कुठलाही तांत्रिक अर्ज ग्राह्य धरला जाणार नाही.

१८.व्यावसायीक अर्ज(दरपत्रके) उघडण्याच्या दिवशी संबंधित व्यापारी अथवा त्याचा प्रतिनीधी यांनी दिलेल्या वेळेत व सुचनेनुसार कारागृहाच्या कार्यालयास उपस्थित राहणे बंधनकारक असेल.सर्व उपस्थीत समिती सदस्य तसेच पुरवठादार/त्यांचे प्रतिनीधी यांच्या प्रत्यक्ष उपस्थीतीची नोंद हजेरी पत्रकावर घेऊन त्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात येतील.

१९.उपस्थित समिती सदस्य ठरलेल्या वेळेनुसार अधिक्षकांच्या ई-मेलवरुन पुरवठादारांचे प्रिंट केलेले तांत्रिक अर्ज समिती समोर ठेवतील.समिती सदस्यांच्या मते ज्या पुरवठादारांचे तांत्रिक अर्ज पात्र झाले आहेत किंवा अपात्र झाले आहेत अशा सगळ्या तांत्रिक अर्जाचा तक्ता बनवुन त्या पुढे समितीचे अभिप्राय घेवुन सदरच्या तक्त्यावर पुरवठादार/प्रतिनीधी यांची स्वाक्षरी घेण्यात येईल तांत्रिक अर्ज अपात्र ठरलेल्या निवीदाकार/पुरवठादारांना पुढील प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.

२०.फक्त तांत्रिक अर्ज पात्र ठरलेल्या पुरवठादारांचीच दरपत्रके सर्वासमक्ष स्वीकारली जातील तांत्रिक अर्ज उघडण्याच्या दिवशीच संबंधित पुरवठादार/प्रतिनीधी त्यांचे व्यावसायीक वस्तुंचे दरपत्रक सिलबंद पाकिटात घेवुन स्वतः उपस्थित राहतील.समिती सदस्यांपुढे ते उघडण्यात येतील सदर दरपत्रके व ज्या सिलबंद पाकिटातुन दरपत्रके दिले आहेत.त्यावर समिती सदस्य सर्व समक्ष स्वाक्षरी करतील.

२१.व्यावसायीक दरपत्रके पुरवठाधारकाने स्वतः संस्थेच्या अधिकृत लेटरहेडवर भरुन देणे बंधनकारक आहे.

२२.सदर दरपत्रकातील वस्तुंच्या दराचे जाहिर वाचन करुन सदर दरपत्रकांचा वस्तुदर व व्यापारी संस्थानिहाय तक्ता बनवुन कमीतकमी दर असलेल्या एल-१,एल-२,एल-३ व्यापारी संस्थाची निवड करावी व सदर तक्त्यावर सर्व समिती सदस्य स्वाक्षऱ्या करतील.

२३.तांत्रिक अर्ज पात्र ठरलेल्या पुरवठादारांच्या दरपत्रकांच्या छायांकित प्रती सर्व पुरवठादारांना एकमेकांना पुरवण्यात येतील.